**सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय दि. १७ जुलै, २०२५ अन्वये निश्चित केलेले "अनुकंपा नियुक्तीचे सर्वसमावेशक सुधारीत धोरण" जिल्हा परिषदेच्या गट-क व गट-ड कर्मचाऱ्यांना लागू करणेबाबत...**

# महाराष्ट्र शासन

ग्राम विकास विभाग
शासन निर्णय क्र. अकंपा-२०२५/प्र.क्र.४४२/आस्था-७
बांधकाम भवन, मर्झबान पथ, २५,
फोर्ट, मंत्रालय, मुंबई ४००००१
तारीख:- ३१ जुलै, २०२५

**वाचा:-** सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र.अकंपा-१२२५/प्र.क्र.१२१/म.लो.आ. दिनांक १७ जुलै, २०२५

**प्रस्तावना:-**

अनुकंपा तत्वावर प्रत्यक्ष नियुक्ती देत असतांना विविध आदेश विचारात घ्यावे लागत असल्याने अंमलबजावणी करणाऱ्या यंत्रणेला सर्व आदेश एकत्रित स्वरुपात मिळावेत यास्तव सामान्य प्रशासन विभागाने अनुकंपा नियुक्ती धोरणाचे यापूर्वीचे सर्व आदेश अधिक्रमित करुन वाचा येथील दिनांक १७ जुलै, २०२५ रोजीच्या शासन निर्णयान्वये "अनुकंपा नियुक्तीचे सर्वसमावेशक सुधारीत धोरण" तयार केले आहे. सदर शासन निर्णयातील अ.क्र. (IX)(४) मध्ये सदर शासन निर्णय हा शासकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांना लागू असून, निम्न शासकीय कार्यालये/स्थानिक स्वराज्य संस्था/शासनाच्या अधिपत्याखालील महामंडळे अथवा प्राधिकरण यामधील अधिकारी व कर्मचाऱ्यांना थेट लागू होत नाही. त्यासाठी संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांसाठी अनुकंपा योजना लागू करण्याबाबत संबंधित प्रशासकीय विभागाने त्यांच्या स्तरावरुन स्वतंत्रपणे निर्णय घेणे आवश्यक राहील, असे नमुद केले आहे. राज्यातील जिल्हा परिषदांमधील कर्मचारी हे स्थानिक स्वराज्य संस्थेचे कर्मचारी असून राज्य शासकीय कर्मचारी नाहीत. त्यामुळे उपरोक्त वाचा येथील शासन निर्णय जिल्हा परिषदांतील कर्मचाऱ्यांना थेट लागू होत नाही. सबब, सदर शासन निर्णयातील तरतुदीमध्ये अंशत: बदल करुन सदर धोरण जिल्हा परिषद कर्मचाऱ्यांना लागू करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय:-**

सामान्य प्रशासन विभागाच्या वाचा येथील दि. १७ जुलै, २०२५ रोजीच्या शासन निर्णयान्वये अनुकंपा नियुक्तीचे सर्वसमावेशक सुधारीत धोरण शासकीय अधिकारी व कर्मचारी यांना लागू करण्यात आले आहे. उक्त शासन निर्णयामध्ये खालील प्रमाणे बदल करुन सदर शासन निर्णयातील उर्वरित सर्व तरतूदी जशा आहेत तशा सर्व जिल्हा परिषद गट-क व गट-ड कर्मचाऱ्यांना लागू करण्यात येत आहेत.

| अ.क्र. | दि.१७.०७.२०२५ रोजीच्या शासन निर्णयातील तरतूदी | जिल्हा परिषद कर्मचाऱ्यांसाठी तरतूदी |
| --- | --- | --- |
| १ | २ | ३ |
| १ | **अ.क्र. (I)(७) अनुकंपा नियुक्तीचे प्रमाणमधील (ब) गट-ड संवर्गासाठी येथे-**<br>गट-ड मधील अनेक संवर्गाची पदे ही संबंधित विभागांच्या सुधारीत आकृतिबंधामध्ये बाह्य यंत्रणेमधून भरण्याबाबत निर्णय झाला असल्याने, अनुकंपा नियुक्तीसाठी पदे उपलब्ध होत नाहीत. यास्तव, या शासन निर्णयाच्या दिनांकापासून प्रथमतः २ वर्षासाठी, गट-ड च्या सरळसेवा कोट्यातील प्रतिवर्षी रिक्त होणाऱ्या २०% पदांवर अनुकंपा नियुक्ती देण्याची मर्यादा शिथिल करुन, गट-ड मधील जेवढी पदसंख्या मृत घोषित केली आहे त्या पदसंख्येच्या मर्यादेत अनुकंपा नियुक्तीसाठी पदे पुनर्जीवित करण्याचे अधिकार प्रशासकीय विभागास देण्यात येत आहेत.<br>शासन निर्णयाच्या दिनांकापासून २ वर्षानंतर गट-ड च्या प्रतिक्षासूचीतील उमेदवारांची संख्या विचारात घेवून मर्यादा शिथिल करण्याबाबत पुनर्विचार करण्यात येईल, अशी तरतुद आहे. | ग्राम विकास विभागांतर्गत जिल्हा परिषद स्तरावरील गट-क व गट-ड कर्मचाऱ्यांच्या सुधारीत आकृतिबंधाची कार्यवाही सुरु असल्याने, या शासन निर्णयाच्या दिनांकापासून प्रथमतः २ वर्षासाठी गट-ड च्या सरळसेवा कोट्यातील प्रतिवर्षी रिक्त होणाऱ्या २०% पदांवर अनुकंपा नियुक्ती देण्याची मर्यादा शिथिल करुन, गट-ड च्या सध्या मंजूर पदांपैकी रिक्त असलेल्या पदांच्या मर्यादेत अनुकंपा नियुक्तीची कार्यवाही करण्यात यावी.<br>शासन निर्णयाच्या दिनांकापासून २ वर्षानंतर गट-ड च्या प्रतिक्षासूचीतील उमेदवारांची संख्या विचारात घेवून मर्यादा शिथिल करण्याबाबत पुनर्विचार करण्यात येईल. |
| २ | **अ.क्र. (IV) कार्यालय प्रमुखाने करावयाची कार्यवाही-**<br>**मधील (३)** येथे विहित मुदतीनंतर कमाल दोन वर्षाच्या कालावधीपर्यंत अर्ज सादर केल्यास, विलंब क्षमापित करण्याबाबतचे अधिकार जिल्हाधिकारी यांना आहेत. | जिल्हा परिषदांच्या बाबतीत विहित मुदतीनंतर कमाल दोन वर्षाच्या कालावधीपर्यंत अर्ज सादर केल्यास, विलंब क्षमापित करण्याबाबतचे अधिकार संबंधित विभागीय आयुक्तांना राहतील. |

| अ.क्र. | दि.१७.०७.२०२५ रोजीच्या शासन निर्णयातील तरतूदी | जिल्हा परिषद कर्मचाऱ्यांसाठी तरतूदी |
|---|---|---|
| १ | २ | ३ |
| ३ | **अ.क्र. (VI) अनुकंपा नियुक्तीसाठी प्रतिक्षासूची ठेवण्याबाबतची कार्यपध्दती-** मध्ये गट-क ची प्रतिक्षासूची जिल्हाधिकारी यांच्या स्तरावर व गट-ड ची प्रतिक्षासूची नियुक्ती प्राधिकारी कार्यालयाच्या स्तरावर ठेवण्यात येईल, अशी तरतूद आहे. | जिल्हा परिषदांच्या बाबतीत गट-क व गट-ड ची प्रतिक्षासूची त्या-त्या जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी (नियुक्ती प्राधिकारी) यांच्या स्तरावर ठेवण्यात याव्यात. |
| ४ | **अ.क्र. (VII) (अ) व (ब) प्रतिक्षासूचीचा गट बदलणे व प्रतिक्षासूचीतील नाव बदलणे -** मध्ये जिल्हाधिकारी कार्यालयाने प्रतिक्षासूचीमध्ये बदल करण्याचा विनंती अर्ज प्राप्त झाल्यास अर्ज प्राप्त झाल्याच्या दिनांकास संबंधित प्रतिक्षासूचीमध्ये समाविष्ट करुन नियुक्ती प्राधिकाऱ्यास अवगत करण्याची तरतूद आहे. | जिल्हा परिषदांच्या बाबतीत अ.क्र. (VII) (अ) अन्वये प्रतिक्षासूचीचा गट बदलण्याचे अधिकार तसेच (ब) अन्वये प्रतिक्षासूचीतील नाव बदलण्याचे अधिकार मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (नियुक्ती प्राधिकारी) यांना राहतील. |
| ५ | **अ.क्र. (VIII) (अ) (६) व (VIII) (ब) (७) शासनास अहवाल सादर करणे-** मध्ये जिल्हाधिकारी कार्यालयाने सहामाही अहवाल सामान्य प्रशासन विभाग मंत्रालय यांना परिशिष्ट “ह” प्रमाणे सादर करावा अशी तरतूद आहे. | जिल्हा परिषदांच्या बाबतीत मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सहामाही अहवाल ग्राम विकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडे सादर करवा. |

२. वाचा येथील दि. १७ जुलै, २०२५ च्या शासन निर्णयामध्ये नमूद केल्यानुसार विहित केलेली कार्यालय प्रमुखांची जबाबदारी (इच्छुकता पत्र भरुन घेणे, इच्छुकता यादी ठेवणे, परिपूर्ण अर्जाची छाननी करुन गट निश्चित करणे, इत्यादी) ही जिल्हा परिषद अंतर्गत संबंधित कार्यालय प्रमुखांची राहील. तसेच सदर शासन निर्णयामध्ये नमूद केल्यानुसार विहित केलेली नियुक्ती प्राधिकारी यांची जबाबदारी जिल्हा परिषद अंतर्गत नियुक्ती प्राधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांची राहील.

३. सदरचे अनुकंपा नियुक्तीबाबतचे धोरण जिल्हा परिषदेने त्यांच्या स्तरावर स्व-उत्पन्नातून नियुक्त केलेल्या कर्मचाऱ्यांना लागू राहणार नाही.

४. वरील परिच्छेद १ मधील स्तंभ ३ येथे केलेले बदल वगळता वाचा येथील सामान्य प्रशासन विभागाच्या दि. १७ जुलै, २०२५ च्या शासन निर्णयातील तरतूदी जशाच्या तशा लागू राहतील.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२५०७३११६०१३०७६२० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Nitin S. Pawar

Digitally signed by Nitin S. Pawar
DN: cn=Nitin S. Pawar, o=Rural Development Department, ou, email=nitin.pawar25@nic.in, c=IN
Date: 2025.07.31 17:48:03 +05'30'

**नितीन स. पवार**
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत,

१) मा. राज्यपाल यांचे सचिव
२) मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव
३) मा. उप मुख्यमंत्री यांचे सचिव
४) मा.विरोधी पक्षनेता, विधानसभा यांचे स्वीय सहाय्यक
५) मा. विरोधी पक्षनेता, विधान परिषद यांचे स्वीय सहाय्यक
६) मा.मंत्री ( ग्राम विकास) यांचे खाजगी सचिव
७) मा. राज्यमंत्री (ग्राम विकास) यांचे खाजगी सचिव
८) सर्व मंत्रालयीन विभागाचे अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव
९) प्रधान सचिव (ग्राम विकास) यांचे स्वीय सहायक
१०) सर्व विभागीय आयुक्त
११) सर्व जिल्हाधिकारी
१२) सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी
१३) सर्व अपर आयुक्त (विकास/आस्थापना), विभागीय आयुक्त कार्यालये
१४) माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई
१५) सर्व सह/उप सचिव, अवर सचिव, कार्यासन अधिकारी, ग्रामविकास विभाग.
१६) माहिती तंत्रज्ञान कक्ष (ग्रा.वि.वि), बांधकाम भवन, मर्झबान पथ, फोर्ट, मुंबई
१७) आपले सरकार कक्ष (ग्रा.वि.वि), बांधकाम भवन, मर्झबान पथ, फोर्ट, मुंबई
१८) निवडस्ती, कार्यासन आस्था -७